## महाराष्ट्र राज्य रस्ता सुरक्षा

### 1. राज्य रस्ता सुरक्षा परिषद :-

राज्य रस्ता सुरक्षा परिषदेची स्थापना मा. मंत्री (परिवहन) यांचे अध्यक्षतेखाली शासनाची अधिसुचना क्र. एमव्हीआर 0215/प्र.क्र. 101/ परि-2, दि. 13.05.2015 रोजी करण्यात आली आहे.

या शिवाय केंद्र शासनाच्या रस्ते वाहतूक मंत्रालयाने दि. 28.09.2017 रोजी अधिसुचना क्र. आर. टी. 25043/03/2017 आर एस नुसार निश्चित केल्याप्रमाणे, जिल्हा स्तरावर जिल्हा रस्ता सुरक्षा समित्यांच्या स्थानिक खासदारांचे अध्यक्षतेखाली पुनर्गठन सर्व जिल्हात करण्यात आले असून त्यांच्या नियमित बैठका घेण्यात येतात.

### 2. जिल्हा रस्ता सुरक्षा समिती:-

मोटार वाहन कायदा, 1988 च्या कलम 215 नुसार शासनाची अधिसुचना क्र. एमव्हीआर 0215/प्र.क्र.101/परि-2,दि.13.05.2015 नुसार प्रत्येक जिल्हयामध्ये रस्त्यावरील अपघात कमी करण्यासाठी व रस्ता सुरक्षा विषयक विविध उपाययोजना राबविण्यासठी जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा रस्ता सुरक्षा समिती स्थापन करण्यात आली आहे. सदर अधिसूचनेमध्ये सुधारणा करण्यात आली असून दि. 05.12.2022 रोजीच्या राजपत्रात प्रत्येक जिल्ह्यासाठी जिल्हा रस्ता सुरक्षा समित्या (DRSC) पुनर्गठीत करण्यात आलेली आहे. जिल्हास्तरावर यानूसार रस्ता सुरक्षा समितीचे कामकाज चालते.

### 3. रस्ता सुरक्षा धोरण:-

**महाराष्ट्र** राज्याकरिता राज्य रस्ता सुरक्षा धोरण शासण निर्णय क्र. एमव्हीआर 0615/प्र.क्र. 271/ परि-2, दि. 14.10.2015 अन्वये मान्य करण्यात आलेले आहे. त्या नुसार विविध रस्ता सुरक्षा उपाययोजना हाती घेण्यात आल्या आहेत.

### 4. रस्ता सुरक्षा शीर्ष संस्था:-

मा. सर्वोच्च न्यायालय दाखल रिट याचिका (सिव्हिल) क्र.295/2012 मध्ये न्यायालयाने दि. 30.11.2017 रोजी पारित केलेल्या आदेशातील मुद्दा क्र. 17 (अ) नुसार सर्व राज्यांना दि. 31.01.2018 पूर्वी रस्ता सुरक्षाविषयक कामकाज हाताळण्यासाठी शीर्ष संस्था स्थापन करण्याचे ओदश दिले आहेत. या संदर्भाने शासन निर्णय क्र.एमव्हीडी-0117/प्र.क्र.14/परि-4 दि. 29.12.2018 रोजी रस्ता सुरक्षाविषयक राज्यस्तरीय कामकाज हाताळण्यासाठी शीर्ष संस्था व त्यासाठी पदनिर्मितीबाबतचे शासन निर्णय जारी करण्यात आले.

### 5. रस्ता अपघात सांख्यिकी माहिती:-

राज्यातील अपघात व अपघाती मृत्युंची सन 2021, 2022 व 2023 मधील तुलनात्मक आकडेवारी खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | वर्ष | एकूण अपघात | एकूण मृत |
|---|---|---|---|
| 1. | 2021 | 29,477 | 13,528 |
| 2. | 2022 | 33,383 | 15,224 |
| 3. | 2023 | 35,243 | 15,366 |
| वर्ष 2022 ते 2023 तुलनात्मक वाढ/घट (+)(-) | | 1860 | 142 |

उपरोक्त प्रमाणे तुलनात्मक आकडेवारीचे अवलोकन करता सन 2022-2023 च्या तुलनेत सन 2023 मध्ये मृतांच्या संख्येमध्ये 0.9% वाढ झाली असल्याचे दिसून येते.

### 6. रस्ता सुरक्षा उपकर :-

महाराष्ट्र मोटार वाहन कर अधिनियम 1958 मध्ये कलम 3 (1अ) व कलम 11 (6) व मोटार वाहन अधिनियम 1988 च्या कलम 2015 (4) मधील तरतुदीनुसार सुधारणा करुन मोटार वाहन करावरील उपकरण लावून त्यामधून येणाऱ्या निधीमधून रस्ता सुरक्षा निधी स्थापना करण्याबाबत शासन निर्णय क्र. एमव्हीआर 0716/प्र.क्र. 324/ परि-2, दि. 01.09.2016 नुसार निर्णय घेण्यात आला आहे.

त्यानुसार राज्यातील नवीन नोंदणी होणाऱ्या व राज्यात कायामस्वरुपी स्थलांतरीत झालेल्या वाहनांवर देय कराच्या विहीत टक्केवारीनुसार रस्ता सुरक्षा उपकर वसुल केला जातो. सदर टक्केवारी वाहन प्रकारनिहाय 0.5% ते 10% उपकर आकारला जातो.

| अ.क्र | मोटार वाहनाचा प्रवर्ग | उपकराचा दर (नवीन नों◌ंदणीच्या वेळी किंवा स्थलांतरीत वाहनांची नोंद घेतेवेळी एकदाच वसुल करण्यात येईल.) |
|---|---|---|
| 1 | एकरकमी कर भरणारी परिवहनेतर (खाजगी) संवर्गातील दुचाकी, तिचाकी व चार चाकी वाहने. | एकरकमी देय कराच्या 2% |
| 2 | एकरकमी कर भरणारी हलकी मालवाहु वाहने | एकरकमी देय कराच्या 4% |
| 3 | वार्षिक एकरकमी कर भरणारी मध्यम व अवजड वाहने. | वार्षिक देय कराच्या 10% |
| 4 | (ऐच्छीक) एकरकमी कर भरणारी मध्यम व अवजड वाहने. | एकरकमी देय कराच्या 2% |
| 5 | एकरकमी कर भरणारी कंत्राटी वाहने (आसन क्षमता 6+1) | एकरकमी देय कराच्या 5% |
| 6 | वार्षिक कर भरणारी कंत्राटी वाहने (आसन क्षमता 6+1) किंवा त्यापेक्षा जास्त | वार्षिक देय कराच्या 5% |
| 7 | वार्षिक कर भरणारी कंत्राटी वाहने (आसन क्षमता 7+1) किंवा त्यापेक्षा जास्त | वार्षिक देय कराच्या 0.5% |
| 8 | वार्षिक कर भरणारी टप्पा वाहतुक वाहने | वार्षिक देय कराच्या 0.5% |
| 9 | वार्षिक कर भरणारी खाजगी सेवा देणारी वाहने | वार्षिक देय कराच्या 5% |
| 10 | उपरोक्त 1 ते 9 मध्ये समाविष्ट नसणारी इतर वाहने. | वार्षिक देय कराच्या 5% |

**7. ब्लॅक स्पॉट :-**

केंद्रिय वाहतूक व महामार्ग विभागाने दि. 28.10.2015 रोजी परिपत्रकाव्दारे, रस्त्यावरील वारंवार अपघात होणारी ठिकाणे ब्लॅक स्पॉट म्हणून निर्देशित करावयाची व्याख्या तयार केली आहे. त्यानुसार सर्व जिल्हातील अपघातांच्या सांख्यिकीचा अभ्यास करुन सन 2022 पर्यंत एकुण 742 ब्लॅक स्पॉट निश्चित केले आहेत. या ब्लॅक स्पॉटवर अल्प मुदतीची व दिर्घ मुदतीची उपाययोजना करण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच रस्ते सुरक्षे संदर्भात काम करणाऱ्या इतर विभागांमार्फत कार्यवाही सुरु आहे.

**8. iRAD ॲप :-**

MORTH ने रस्ता अपघातांची माहिती संकलित करयासाठी iRAD हे ॲप विकसित केले आहे. हे ॲप संपुर्ण महाराष्ट्रात कार्यान्वित केले असून सद्यस्थितीत या ॲपव्दारे पोलीस विभाग व परिवहन विभाग यांचेमार्फत अपघातांची माहिती संकलित केली जात आहे.

7 जून 2024 पर्यंत iRAD App मध्ये 1,78,891 अपघातांची नोंद घेतली गेली आहे. ज्यामध्ये 45,865 प्राणघातक अपघातांचा समावेश आहे.

**9. DPDC फंड :-**

स्थानिक पातळीवर स्थानिक परिस्थितीनुसार अपघातप्रवण क्षेत्राची दुरुस्ती करणेकरीता व रस्ता सुरक्षेबाबत इतर उपाययोजना राबविण्याकरीता जिल्हा स्तरावर जिल्हा नियोजन समिती अतंर्गत रस्ता सुरक्षा उपाययोजना करण्यासाठी स्वतंत्रपणे "**जिल्हा रस्ता सुरक्षा उपाययोजना**" ही योजना सुरु करण्यात आली असून त्याबाबत दि. 20.03.2023 रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. नियोजन विभागाच्या दि.16.10.2023 च्या शासन ज्ञापन अन्वये जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या जिल्हा रस्ता सुरक्षा उपाययोजना या योजनेकरीता एकूण 36 जिल्ह्यांसाठी नविन लेखाशीर्ष उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

**10. अधिकारी प्रशिक्षण :-**

अपघातांच्या विश्लेषणामध्ये सुलभता आणण्याच्या दृष्टीकोनातून जून 2022 पासून परिवहन विभागामार्फत अपघातांचे शास्त्रोक्त पद्धतीने विश्लेषण करण्यासाठी सर्व प्रादेशिक तसेच उपप्रादेशिक परिवहन कार्यालयातील उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, मोटार वाहन निरीक्षक तसेच सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक यांना KPMG प्रतिनिधी यांचेमार्फत 2 दिवसांचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. या प्रशिक्षणामध्ये अपघातांचे शास्त्रोक्त पद्धतीने विश्लेषण करण्यासाठी ज्या मार्गदशक बाबींचा समावेश करण्यात आला त्या मार्गदशक बाबींवर आधारित एक मार्गदर्शक पुस्तिका (Booklet) KPMG प्रतिनिधी यांनी तयार केली असून त्या पुस्तिकेच्या 3000 छापील स्वरुपातील प्रती सर्व प्रादेशिक/उपप्रादेशिक परिवहन कार्यालयांमध्ये वितरीत करण्यात आलेल्या आहेत.

**11. महामार्ग अंमलबजावणी मोहीम :-**

मुंबई-पुणे महामार्गावर वाहतूकीस शिस्त लागावी तसेच अपघातांची संख्या लक्षणीयरित्या कमी करण्यासाठी दि.01.12.2022 पासून 6 महिन्यांकरिता 24 तास "सुरक्षा" या रस्ता सुरक्षा जनजागृती व अंमलबजावणी उपक्रमांतर्गत विशेष तपासणी मोहीम सुरु करण्यात आली आहे. त्यासाठी तपासणी पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे. एका तपासणी पथकात किमान दोन मोटार वाहन निरीक्षक तसेच पथकाचे नियंत्रक अधिकारी हे सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी आहेत. डिसेंबर 2022 ते मे 2023 पर्यंत 11,110 वाहनांची तपासणी करण्यात आली असून त्यापैकी 59,379 दोषी वाहनांवर कार्यवाही करण्यात आलेली आहे.

या मोहिमेचा परिणाम म्हणजे जानेवारी 2022 ते मे 2022 च्या तुलनेत जानेवारी 2023 ते मे 2023 या कालावधीत अपघातांच्या संख्येत **8 टक्क्यांनी घट** झालेली आहे.

**12. समुपदेशन केंद्र :-**

राज्यात समृद्धी महामार्ग व मुंबई - पुणे एक्सप्रेस हायवे या दोन्ही ठिकाणी सर्व प्रकारच्या वाहनचालकांमध्ये रस्ते सुरक्षेविषयक जनजागृती करण्यासाठी समुपदेशन केंद्रे सुरु करण्यात आली आहेत.

**13. पादचाऱ्यासाठी Walk on Right मोहीम :-**

परिवहन विभागामार्फत सातत्याने याबाबत कार्यवाही सूरु आहे. सर्व प्रादेशिक/उपप्रादेशिक परिवहन कार्यालयांना वर्षभर रस्ता सुरक्षा अभियान राबवून विशेषत: पादचाऱ्यांसाठी "रस्त्याच्या उजव्या बाजूने चला" (Walk on Right) ही मोहीम सुरु करण्याबाबत तसेच जनजागृती करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

**14. दुचाकी वाहनचालकांचे समुपदेशन व जनजागृती :-**

दुचाकी वाहन चालकांच्या अपघातांचे तसेच अपघाती मृत्यूंचे प्रमाण कमी करण्याच्या उद्देशाने संपुर्ण राज्यात दुचाकी चालकांचे रस्ता सुरक्षा व कायदेशीर तरतुदींबाबत "**समुपदेशन, जनजागृती व अंमलबजावणी अभियान**" राबविण्यासाठी परिवहन आयुक्त कार्यालयाकडून दि. 16.06.2023 रोजी परिपत्रक जारी करण्यात आले आहे. याअंतर्गत पुढीलप्रमाणे कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे.

1. लायसन्स नसलेल्या व अल्पवयीन मुलांना दुचाकी चालविण्यापासून प्रतिबंध करणे व पालकांचे समुपदेशन करणे. (मोटार वाहन कायदा 1988, कलम 3, 4)
2. मोटार वाहन कायदा 1988 मधील कलम 112 अंतर्गत वेगमर्यादेचे पालन करणे.
3. मोटार सायकल वाहनांवर सुरक्षेकरीता आवश्यक उपकरणांची अंमलबजावणी करणे.
4. दुचाकीवर मोटारसायकलस्वार स्वत: व्यतिरिक्त एकापेक्षा अधिक व्यक्ती घेऊन जाणार नाही या कायदेशीर तरतुदीची अंमलबजावणी करणे.
5. वाहन उत्पादकामार्फत वाहन खरेदीच्या वेळी खरेदीदारास दोन हेल्मेटचा पुरवठा करण्याच्या कायदेशीर तरतुदीची अंमलबजावणी करणे.
6. हेल्मेट वापरासाठी दुचाकीचालक/दुचाकीस्वार/वाहनमालक व कारणीभूत असलेल्या व्यक्तींचे/संस्थांचे समुपदेशन व दंडात्मक कारवाई करणे.

**15. महामार्गावर होणारे बसेसचे अपघात टाळण्यासाठी करावयाची अंमलबजावणी व उपाययोजना:-**

महामार्गावर बसेसचे वाढते अपघाताचे प्रमाण नियंत्रित करण्याच्या अनुषंगाने दि. 11.07.2023 रोजी सर्व प्रादेशिक/उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांची बैठक घेवून बैठकीमध्ये महामार्गावर होणारे बसेसचे अपघात टाळण्यासाठी परिवहन विभागामार्फत विशेष मोहिम राबविण्यासाठी पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात आले आहेत.

1. सर्व सीमा तपासणी नाक्यांवर समुपदेशन केंद्रे सुरु करण्यात यावी.
2. परिवहन विभागामार्फत कार्यरत सर्व वायुवेग पथकांनी त्यांच्या अखत्यारीत वाहतुक करणाऱ्या सर्व बसेसची तांत्रिकदृष्ट्या काटेकोरपणे तपासणी करावी.
3. मद्यपान करुन वाहन चालविणाऱ्या चालकांची तपासणी करण्यासाठी सर्व सीमा तपासणी नाक्यांवर व सर्व वायुवेग पथकांनी त्यांच्या अखत्यारीत वाहतुक करणाऱ्या सर्व बसेसच्या चालकांची ब्रेथ ॲनालायझर च्या साहाय्याने तपासणी करावी व दोषी आढळल्यास दंडात्मक कारवाई व लायसन्स निलंबनाची कारवाई करावी.

**16. नेत्र तपासणी आरोग्य शिबीराचे आयोजन :-**

सद्यस्थितीत राज्यामध्ये होणाऱ्या गंभीर अपघातांचे विश्लेषण केल्यास बसेसच्या अपघातांमध्ये होणारी जिवितहानी सर्वाधिक आहे. ही मोठ्या प्रमाणावरील जिवितहानी टाळण्यासाठी विशेषत: सर्व प्रकारच्या बसचालकांची आरोग्य व नेत्र तपासणी होणे आवश्यक आहे. या तपासणी शिबीराचे व प्रशिक्षण कार्यक्रमांचे सर्व प्रादेशिक परिवहन व उपप्रादेशिक कार्यालयांनी आयोजन करण्याबाबत सूचना देण्यात आल्या. व नेत्र तपासणी आरोग्य शिबिराच्या आयोजनाकरीता सर्व प्रादेशिक परिवहन कार्यालय व उपप्रादेशिक कार्यालय यांना प्रत्येकी रु 5.00 लक्ष अनुदान रस्ता सुरक्षा निधीतून उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

--------------000------------